
# माझें पुरवणी वाचन

## पुस्तक पहिलें




—: लेखक :—

**रं. म. जोशी** ( निर्मळ गुरुजी )

: साहाय्यक :

**...वळे—गोंधळेकर**



IRBK-0103804



...द प्रकाशन [ किं. ६ आणे



म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बाल. वा.
दा. क्र. ३२०४

# माझें पुरवणी वाचन

## ( सचित्र ) पुस्तक पहिलें

[ मराठी इयत्ता पहिली व दुसरीकरितां

व

साक्षरता प्रसाराच्या पहिल्या वर्षाकरितां ]

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. ३८०८ नों. दि ........
वि. ....... क्र. ........
वा-वा
३७३० २९०३२
वा. वा.
१२०७
३१-३-६९

लेखक :—

रं. म. जोशी ( निर्मळ गुरुजी )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम २९०३२
विभाग वा. वा.
क्रमांक १२०७
नों. दि. ३१।३।६९
वाचनालय शाखा

—: साहाय्यक :—

शं. रा. देवळे

वि. न. गोंधळेकर

IRBK-0103804
IRBK-0103804

१९५ प्रकाशन [ किं. ६ आणे

# पालकांशीं हितगुज—

आपले बाळगोपाळ आतां शाळेंत जाऊं लागून त्यांचा नेमलेल्या पाठ्यपुस्तकांचा अभ्यास चालू असेलच. तथापि 'आम्हांला आतां छान छान गोष्टींचीं, चित्रांचीं व मौजेचीं पुस्तकें वाचायला आणून द्या' असा त्यांचा लकडा आपल्या मागें सारखा लागला असेलच ! आणि आपणांपुढें 'आतां यांना मनोरंजक वाचनाकरितां कोणतीं पुस्तकें आणून द्यावींत ?' असा प्रश्न उभा असेल.

ही गोष्ट ओळखूनच आम्हीं 'माझें पुरवणी वाचन' या नांवाची माला इयत्तावार चालू केली आहे. या मालेचें पहिलें पुष्प आपल्या हातीं देतांना आम्हांस फार आनंद होत आहे.

आपण आपल्या बाळगोपाळांकडून हें पुस्तक वाचून घ्यावें व धड्याखालीं दिलेले प्रश्न प्रथम तोंडी सोडवून घेऊन नंतर सवडीप्रमाणें त्यांचीं उत्तरें लिहून घ्यावीं.

आपणांस आलेला अनुभव आपण आम्हांस कळविल्यास आम्ही आपले आभारी होऊं.

आपले


**जोशी–देवळे–गोंधळेकर**

पाठ पहिला

# खेळकर वसंत



हा आमचा वसंत.
हा भारी खेळकर आहे.
याला घर आवडत नाहीं.
नेहमीं घराबाहेर लक्ष.
विजार, सदरा घालील,
खिशांत खाऊ घेईल,
चेंडू दांडू घेईल
आणि घराबाहेर जाईल.



आईनें पाट मांडला,
ताट वाढून ठेविलें,
तरी हा खिडकीजवळच उभा.
बाहेर मुलें खेळत आहेत.
मग हा कसा जेवणार ?
खेळाचा खोळंबा होणार ना !
कसेतरी चार घास घेईल,

लगेच घाईघाईनें घरांत कोंबील,
आणि मैदान गांठील.
मग आई रागावते.
बाबा दरडावून सांगतात.
तरी हा ऐकत नाहीं.
वसंत शाळेंत वेळेवर जातो,
पण दांडगाई फार करतो.
गुरुजी कंटाळतात.
ते सांगतात,—
मुलांनीं सायंकाळीं खेळावें;
पण सकाळीं लिहावें आणि वाचावें.
खेळण्याचे वेळीं खेळ.
कामाचे वेळीं काम.

उत्तरें द्या:—

(१) वसंत काय काय करतो ?

(२) तो खिडकीजवळ कां उभा आहे ?

(३) गुरुजी त्याला काय सांगतात ?

पाठ दुसरा

# सापाला वाजली थंडी !



पहाट झाली. कोंबडा आरवला.
सदोबा शेतकरी उठला,
शेतावर गेला आणि
कामाला लागला.
खंडू, पांडू आणि बंडू उठले.
पहाटचा गार वारा.
रानांतील थंडी.
अंगांत हुडहुडी भरली.

मुलांनीं चिपाडें जमविलीं.
धावेजवळ शेकोटी पेटविली.
तेथें तीं मजेनें शेकत बसलीं.
"सळ सळ सळ" गवतांतून आवाज आला
शेकोटीजवळ साप आला.
तो शेकूं लागला.
मुलें भ्यालीं, ओरडलीं आणि पळालीं.
सदोबानें मोट थांबविली,
बंडूला कडेवर घेतलें आणि
पांडूचा हात धरला.
धीट बंडू सापाकडे पाहात राहिला.
सापाला वाजली होती थंडी.
सापानें थोडें अंग शेकलें,
सापाला हुशारी आली,
नंतर तो गुपचुप निघून गेला.
सदोबा बोलला,
"सापाला डिंवचूं नका.

जशी आपणाला थंडी वाजते,
तशी सापालाही वाजते.
सापानें अंग शेकलें.
तो गुपचुप गेला.
भिऊं नका;
पण सावध राहा.''

उत्तरें द्याः—

(१) मुलांनीं शेकोटी कां पेटविली ?

(२) मुलें कां भ्यालीं ?

(३) सदोबा काय बोलले ?

## पाठ तिसरा

# माकडवाला

चौकांत माकडवाला आला.
दोन माकडें आणि एक बोकड.
कुडबुडें वाजलें.
लोक भराभर जमले.
आतां खेळ सुरू झाला.
"—भागूबाई, घागर घे,
पाणी आण आणि भाकरी कर.
बजरंगाला जेवायला वाढ.
बजरंग बाजाराला जाईल."
खोगीर चढवून बोकड तयार झाला.
हा पाहा बजरंगाचा घोडा.
बजरंगानें फेटा बांधला,
आरसा पाहिला.
अहाहा ! काय पण थाट !
बजरंग बोकडावर बसला.
बोकड चालूं लागला.
झाला बाजार.
आलें घर.



बजरंग आणि त्याचा घोडा

"—भागे, नवी साडी घे—"
भागी मान खालीं घालून बसली.
तिला साडी आवडेना.
ती रुसली.
बजरंगाचा अपमान झाला.
बजरंगानें हातांत काठी घेतली.
भागी माकडवाल्यामागें लपली.
बजरंग धावून मारूं लागला.
माकडवाला भांडण तोडूं लागला.
लोक खो खो हंसले.
लोकांनीं पैसे फेकले.
ते माकडवाल्यानें गोळा केले.
तेथून तो दुसरीकडे गेला.
एक गांव संपला कीं दुसरा !

ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम 25093
विभाग का-वा
क्रमांक 12078
नों. दि. 3/13/

उत्तरें द्याः—

(१) कुडबुडें कोणीं वाजविलें ? कां ?
(२) माकडवाल्यानें कोणता खेळ केला ?
(३) खेळांतील भागूबाई कोण ? बजरंग कोण ? त्यांचा घोडा कोणता ?
(४) लोक कां हंसले ? त्यांनीं काय दिलें ?

पाठ चौथा

# धम्मक लाडू

मामा आले! मामा आले!
नंदूला आनंद झाला.
मामांनीं पेटी ठेवली,
वळकटी ठेवली;
पिशवी ठेवली.
नंदूला जवळ घेतलें.
" कसें काय नंदू,
ठीक आहे ना ?"
आई घरांत गेली;
चहा करायला लागली.
मामा घरांत गेले;
पाटावर बसले.
दोघेजण बोलूं लागले.
नंदूला वाटलें,

मामा गांवाहून आले;
पण मामांनीं खाऊ कसा दिला नाहीं ?
मामा विसरले असतील.
पाहूं तरी पिशवींत.
नंदूनें पिशवी ओतली.
पिशवींत बुकें होतीं,
कागद होते,
पण खाऊ कांहींच नाहीं.
नंदूला राग आला.
नंदूनें बुकें फेकलीं, कागद चुरगाळले.
एक छानदार चित्र होतें;
तें नंदू पाहात बसला.
मामा घरांतून आले.
मामांनीं नंदूची खटपट पाहिली.
मामांना नंदूचा राग आला.
पिशवींत कामाचे कागद होते.
नंदूनें ते नासले.



मामांनीं नंदूला धपाटा लगावला.
नंदूला धम्मक लाडू मिळाला.
रडत रडत नंदू बोलला,
“ मामा, मामा, मीं खाऊ शोधला;

पण तो तर तुमच्या हातांत होता.
हाच का मला खाऊ आणला होता ?"
मामांना वाईट वाटलें.
ते नंदूला जवळ घेऊं लागले,
पण तो दूर पळून गेला.

उत्तरें द्या:—

(१) नंदूला आनंद कां झाला ?

(२) मग: नंदूनें काय केलें ?

(३) मामा कां रागावले ?

(४) नंदूला कोणता खाऊ मिळाला ?

(५) नंदू दूर कां पळून गेला ?

## पाठ पांचवा

# गारुड्याचा खेळ



“ ढम् ढम् ढमक । ढम्चिक् ढमक्. ”

ढोलकें वाजूं लागलें.

गारुडी आला.

मुलें भरभर जमलीं.

माणसें खेळ पाहूं लागलीं.
गारुडी पुंगी वाजवूं लागला.
तीन साप खेळूं लागले.
नंतर ते टोपलींत गेले.
आतां गारुड्यानें मोठा अजगर काढला.
अबब ! केवढा हा साप !
गारुड्यानें तो गळ्यांत घातला.
त्यानें कुडबुडें वाजविलें,
नवी टोपली उघडली;
नागाला जागे केलें.
फणा उभारून नागोबा उठला.
गारुडी पुंगी वाजवूं लागला.
नाग डोलूं लागला.
लोकांना आनंद झाला.
लोकांनीं नागोबाला पैसे दिले.
गारुडी जादूचे खेळ करूं लागला.
त्यानें मातीचे रुपये करून दाखविले.
ते छन् छन् वाजवले,
पण शेवटीं त्यानें भीक मागितली.
गारुड्यानें बीं पेरलें.

झाड उगवलें.
झाडाला गोड आंबे आले.
मुलांनीं जादूचे आंबे खाल्ले.
सगळा जादूचा खेळ.
गारुड्यानें तोंड उघडलें,
तोंडांतून मोठी गोटी काढली.
कागदाचा चुरा तोंडांत घातला,
व त्यापासून एक सुंदर गोफ बाहेर काढला
गारुडी जादूनें मुलांना गंमत दाखवतो.
मुलांना मौज वाटते.
शेवटीं तो भीक मागतो.
लोक पैसे देतात.
मुलें भाकरी देतात.
तो पैसे घेतो, भाकरी खातो आणि
दुसऱ्या गांवाला निघून जातो.

उत्तरें द्याः—

(१) गारुडी ढोलकें कां वाजवितो ?
(२) तो कोणते खेळ करतो ?
(३) मुलांना काय वाटतें ?
(४) लोक गारुड्याला काय देतात ?

## पाठ सहावा

# वाघोबाचा उपवास

जंगलांत मोठा थाट केला.
झाडांना तोरणें लाविलीं.
वाघोबा पारावर बसले.
वाघोबांनीं हातांत माळ घेतली.
ते गणपतीचा जप करूं लागले.
कोल्होबा मोठे लबाड.
ते वाघोबाची सेवा करूं लागले.
त्यांनीं जंगलांत सांगितलें,
गांवांत दवंडी दिली;
" ऐका हो ऐका.
आनंदाची बातमी.
वाघोबानें उपवास धरले.
ते देवपूजेला लागले.
ते खात नाहींत; पीत नाहींत.
वाघोबा जंगलचे राजे आहेत.
ते उपवास करणार आणि लौकरच मरणार
एकदां सारेजण भेटायला या."



वाघोबा उपासाला बसले आणि सारेजण जमले.

सर्वांना वाघोबाची दया आली.
गायताई दुधाळ, शेळीबाई तोंडाळ,
घोडोबा खिंकाळे, मोतीराम कुत्रे,
उंटाजी माने, कोंबडभाऊ कोकणे,
सारेजण आले; पारापाशीं जमले.
कोणीं फळें आणलीं, कोणीं दूध आणलें.
गणपतीला राग आला.
पारावर एकदम गणपती आले.
ते सांगूं लागले.
" वाघोबा ढोंगी आहे. फसूं नका.
तो खोटा उपवास करतो. घरीं पळा अगोदर.
गोड गोड बोलेल, थापा मारील आणि
सगळ्यांना खाऊन टाकील.
गणपती निघून गेले.
सारेजण पळाले.
वाघोबा रागावले.
त्यानीं बारा हात उडी मारली,
दोनचार जनावरांना पकडलें आणि
आपली शिकार साधली !

वाघोबांची झाली फजिती



वाघोबांची मेजवानी झाली.
उरलें सुरलें मांस कोल्होबानें मटकावलें.
खाऊन पिऊन पोट फुगलें.
दोघेजण लोळले.
शिकार साधली.
उपवास सुटला.
ढोंगी वाघानें जनावरांना फसविलें.
गणपती देवाला फार राग आला.
गणपतीनें हें सगळें महादेवाला सांगितलें.
तेही संतापले.
दोघेजण वाघाजवळ आले.
वाघोबा आणि कोल्होबा यांना
त्यांनीं ठार मारलें.

उत्तरें द्याः—

(१) वाघोबानें उपवास कां सुरू केला ?
(२) कोल्होबानें काय केलें ?
(३) वाघोबाला पाहायला कोण कोण आले ?
(४) त्यांना गणपतीनें काय सांगितलें ?
(५) महादेव कां रागावले ?
(६) त्यांनीं काय केलें ?

अनुक्रम २९
विभाग
क्रमांक

## वाघोबांची झाली फजिती



वाघोबांची मेजवानी झाली.
उरलें सुरलें मांस कोल्होबानें मटकावलें.
खाऊन पिऊन पोट फुगलें.
दोघेजण लोळले.
शिकार साधली.
उपवास सुटला.
ढोंगी वाघानें जनावरांना फसविलें.
गणपती देवाला फार राग आला.
गणपतीनें हें सगळें महादेवाला सांगितलें.
तेही संतापले.
दोघेजण वाघाजवळ आले.
वाघोबा आणि कोल्होबा यांना
त्यांनीं ठार मारलें.

उत्तरें द्याः—

(१) वाघोबानें उपवास कां सुरू केला ?
(२) कोल्होबानें काय केलें ?
(३) वाघोबाला पाहायला कोण कोण आले ?
(४) त्यांना गणपतीनें काय सांगितलें ?
(५) महादेव कां रागावले ?
(६) त्यांनीं काय केलें ?

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

क्र. क्रं. 3808 नों. ...
दि. धा. वा.

# ‘ माझें पुरवणी वाचन ’

## पुस्तक १ लें

## या पुस्तकांत काय वाचाल ?


| पाठ | नांव | पान |
|---|---|---|
| १ ला | खेळकर वसंत | ३ |
| २ रा | सापाला वाजली थंडी ! | ६ |
| ३ रा | माकडवाला | ९ |
| ४ था | धम्मक लाडू ! | १२ |
| ५ वा | गारुड्याचा खेळ | १६ |
| ६ वा | वाघोबाचा उपवास ! | १९ |


IRBK-0103804

प्रकाशकः—वि. न. गोंधळेकर, १२३ शुक्रवार पेठ,
प्रल्हाद मंदीर, पुणें २

मुद्रकः—स. रा. सरदेसाई, बी.ए., एलूएल्.बी., नवीन
समर्थ विद्यालयाचा ‘ समर्थ भारत ’ छापखाना,
४१ बुधवार, पुणें २